सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३४ | बुधवार, दि. २९ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२९ ऑक्टोबर

- महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक सभेची स्थापना.
- महर्षी धोंडो केशव कर्वे यांना भारतरत्न प्रदान करण्यात आला.
- डॉ. टी. ज्ञानशेखरन आणि आर.ई.के. मूर्ती यांना विज्ञान आणि तंत्रज्ञानातील कामगिरीसाठी होमी भाभा पुरस्कार.
- कामिनी, स्वदेशी बनावटीची ३० मेगावॉटची अणुभट्टी कल्पक्कम येथे कार्यान्वित झाली.
- शास्त्रीय गायिका गिरिजादेवी यांची मध्य प्रदेश सरकारने तानसेन पुरस्कारासाठी निवड केली.
- माणिक वर्मा प्रतिष्ठानचा पहिला ' मणिकरत्न पुरस्कार ' गणतपस्विनी मोगुबाई कुर्डीकर यांना प्रदान करण्यात आला.
- अभिनेते दिलीप कुमार यांना प्रतिष्ठित एन.टी. रामाराव राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

दणकून केला दिवाळी फराळ, आता ॲसिडिटीने काढला जाळ !



...पान ३ वर

गणेश चतुर्थीला चंद्रदर्शन का करत नाही?

...पान ४ वर

## प्रकाशन दीपावली विशेषांकाचे...!



दै. ग्लोबल महातेज तर्फे मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या इंपोर्टेड ग्लेझ कागदाचा दीपावली विशेषांकाचे श्री मंगळग्रह मंदिरात प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष श्री. एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, विश्वस्त श्रीमती जयश्रीताई साबे, मंगल सेवेकरी श्री. प्रकाश मेखा, श्री. आर. टी. पाटील, श्री. व्ही. व्ही. कुलकर्णी, सौ. सुनीताताई कुलकर्णी, सौ. आशाताई महाले, मंदिराचे पुरोहित श्री. अतुल दीक्षित, ' ग्लोबल महातेज 'चे कार्यकारी संपादक भरत पाटील, मार्केटिंग मॅनेजर शरद कुलकर्णी, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, उपसंपादक योगेश महाजन, चीफ आर्टिस्ट समीर सांगळे, आर्टिस्ट विशाल पाटील, वितरण सहयोगी संदीप पाटील. (छायाचित्र : नितेश बारी)

## खा. शि. मंडळाचा निवडणूक कार्यक्रम ३१ ऑक्टोबरला जाहीर होणार : झाबक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर येथील खानदेश शिक्षण मंडळाची त्रैवार्षिक निवडणूक ३१ ऑक्टोबर रोजी जाहीर करणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र झाबक यांनी दिली आहे.

यासंदर्भात श्री झाबक यांनी सांगितले, की संस्थेच्या निवडणुकीसंदर्भात दि. १८ सप्टेंबर रोजीच्या सुमारे शंभर सभासदांच्या हजेरीत दिलेल्या आश्वासनानुसार मी संस्थेच्या चिटणीसांकडे निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यासाठी एक ऑक्टोबर रोजी पत्र दिले होते. त्यानुसार संस्थेच्या कार्यकारी मंडळाने सकारात्मकता दाखवून कार्यकारी मंडळाच्या दि. १६ ऑक्टोबर रोजीच्या सभेत सदरच्या पत्रावर चर्चा केली .त्यात तत्काळ निवडणूक घेण्याच्या दृष्टीने निवडणूक कार्यक्रम तयार करून मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यावर माझी सही आहे. त्यानुसार संस्थेकडून लवकरच संस्थेच्या जुन्या घटनेतील तरतुदीनुसार निवडणूक कार्यक्रमानुसार सभासदांची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाल्यानंतर निवडणूक कार्यक्रम जाहीर केला जाणार आहे .

# टाकरखेडा रेल्वे बोगदा साचलेल्या पाण्यामुळे अखेरचा प्रवास ठरण्याची शक्यता

## प्रवासी वर्षानुवर्षे त्रस्त, प्रशासन मात्र सुस्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर येथून जळगाव कडे जाणाऱ्या रस्त्यावर अवघ्या सहा ते सात किलोमीटर अंतरावर असलेला सतीमाता मंदिराजवळील चांदणी-कुऱ्हे गावातील मागील रेल्वे बोगदा २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी झालेल्या पावसानंतर अक्षरशः जीवघेण्या तलावात रूपांतरित झाला आहे. बोगद्यात तीन फूटांवर पाणी साचल्याने वाहनधारकांचे हाल झाले. प्रशासनाच्या बेफिकिरी बाबत प्रवाशांनी संतप्त भावना व्यक्त केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर या बोगद्यातील प्रवास कुणा अभाग्यासाठी अखेरचा प्रवास ठरण्याची शक्यता नाकारतां येत नाही.

बोगद्यात चार चाकी गाड्या बंद पडण्याच्या धाकाने वाहन चालक अति वेगाने गाड्या चालवत होते . तर दुसरीकडे जीव मुठीत धरून दुचाकीस्वार समोरच्या उभ्या वाहनाच्या प्रकाशातून पाण्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करत होते. बोगद्यात पाणी वाढल्याने काही दुचाकी बंद पडल्या. काही जण घसरुन पडले. त्यातील काहींना तर पाण्यातून उभे राहणेही कठीण झाले होते. सोबत लहान मुले असलेल्या महिलांची अवस्था तर खूपच केविलवाणी होती. बालकांना घेऊन त्या पाण्यातून अक्षरशः जीव मुठीत घेऊन वाट होत्या.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

### अंधार, खड्डे आणि निष्क्रिय प्रशासन!

या बोगद्यात दोन्ही बाजूंनी तीव्र वळणं असल्याने दृश्यता कमी मिळते. अंधारात खोल खड्डे आणि चिखलामुळे वाहने थरथरत चालतात. रात्री तर हा बोगदा प्रवाशांसाठी जीवघेणा सापळा ठरतोय.दरवर्षी पावसाळा सुरू होताच याच जीवघेण्या कहाणीची पुनरावृत्ती होते. बोगद्यात पाणी साचते...नागरिक त्रस्त होतात...अपघात घडतात ... थोडीफार बोंबाबोंब होते ... पाणी ओसरले की प्रशासन ' सब आलबेल है ' म्हणायला मोकळे होते.नंतर काही दिवसांनी प्रशासनाची कागदोपत्री कारवाई सुरू होते. पण कायमस्वरूपी उपाययोजना मात्र आजवर झालेली नाही.

### प्रशासन फक्त पाहतेय, जनता बुडतेय!

काल अनेक प्रवाशांनी संतप्त भावना व्यक्त केल्या "या बोगद्यात एखाद्याचा जीव गेला की मगच यंत्रणा जागी होइल का?" असा सवाल विचारला जात आहे. अन्य दिवसांमध्ये ही कोणत्या ना कोणत्या कारणास्तव बऱ्याचदा या बोगद्यात पाणी साचलेलं असते .पाणी ओसरायला तासन्तास लागतात. परिणामी वाहनधारक रांगेत उभे राहून वाट पाहत राहतात. काही जण परत फिरून अन्य मार्गाने इच्छित स्थळी पोहोचतात. काहींना मदत घेऊन वाहन ढकलत बाहेर काढावी लागतात. सदर बोगद्यात साचलेले पाणी हा जणू प्रशासनाचा निष्काळजीपणाचा पूर आहे. या ठिकाणी तातडीने पाणी निचरा, प्रकाशव्यवस्था आणि रस्त्याची सुधारणा व्हावी यासाठी लोकप्रतिनिधींनीही आता युद्ध पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे . त्याचे कारण म्हणजे सदर बोगदा आता फक्त मार्ग राहिलेला नाही तर तो प्रशासनाच्या अपयशाचं प्रतीक बनला आहे. दरवर्षी विविध वृत्तपत्रे व प्रसार माध्यमांमध्ये या बोगद्यातील साठलेल्या पाण्यामुळे प्रवाशांचे होणारे हाल अपेष्टांचे फोटो प्रसिद्ध होतात.दरवर्षी संबंधितांकडून लवकरच सारे काही ठीकठाक करण्याची आश्वासनेही मिळतात. पुढील वर्षी पुन्हा येरे माझ्या मागल्या याप्रमाणे बोगद्यातील घाणेरड्या पाण्यात जीवाच्या आकांताने मार्गक्रमण करणारे प्रवासी आणि प्रशासनाची निद्रिस्तता व निष्क्रियताच पाहावयास मिळते.

# 'शविआ' व राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे अमळनेरला आज कार्यकर्ता मेळावा

## आमदार अनिलदादा पाटील फुंकणार निवडणुकीचे रणशिंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर मतदारसंघातील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमळनेर तालुका व शहर विकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे भव्य बूथ कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता कलागुरू मंगल कार्यालयात होईल. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या नेतृत्वात हा मेळावा होईल. मेळाव्यात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे रणशिंग फुंकले जाणार आहे.

आगामी काळातील पालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हा मेळावा महत्वपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण भागातील प्रमुख कार्यकर्त्यांची स्वतंत्र बैठक नुकतीच आमदार अनिलदादा पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली होती. या बैठकीत कार्यकर्त्यांकडून महायुतीबाबत सकारात्मकता दर्शविण्यात आली आहे. अनिलदादा पाटील जो निर्णय घेतील तो मान्य राहील, असा सूर कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. शहराच्या बैठकीत देखील भाजपला एकत्र घेण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. मात्र, निवडणूक शहर विकास आघाडीच्या माध्यमातूनच लढविली जावी, असा आग्रह माजी नगरसेवक व इच्छुक उमेदवारांनी धरला आहे. मात्र, यासंदर्भात मेळाव्यानंतर महायुतीच्या नेत्यांशी चर्चा होईल. त्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल, असे अनिलदादा पाटील यांनी जाहीर केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दोन्ही निवडणूका जोमाने लढवून कार्यकर्त्यांना न्याय देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला आहे. यामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह द्विगुणित झाला आहे. शहर व ग्रामीण दोन्ही बैठकीत कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

पान ३ वर

## आठवा वेतन आयोग : केंद्र सरकारची मान्यता

केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला मान्यता दिली आहे. आयोग १८ महिन्यांत त्यांच्या शिफारशी सादर करेल. याचा फायदा सुमारे ५० लाख केंद्रीय सरकारी कर्मचारी आणि ६९ लाख पेन्शनधारकांना होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दि. २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत यासंबंधीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले, की केंद्रीय मंत्रिमंडळाने आठव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या संदर्भ अटींना मान्यता दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश रंजना प्रकाश देसाई अध्यक्ष असतील.

# बस आगारातील ऑनलाईन प्रणालीचा बोजवारा!



## प्रवाशांमध्ये संतापाचा उद्रेक; राज्य परिवहन महामंडळाचे अक्षम्य दुर्लक्ष!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ (एमएसआरटीसी) अमळनेर आगारातील ऑनलाईन व्यवस्थेतील त्रुटीमुळे प्रवाशांची गैरसोय झाली आहे. अमळनेर ते छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील बससेवेबाबत चौकशी विभागाकडे माहिती नाही. यामुळे प्रवाशांना तब्बल तीन तासांहून अधिक काळ प्रतीक्षा करावी लागली. पान ३ वर



"संपूर्ण जग ऑनलाईन व्यवस्थेकडे वळले आहे. मात्र, शासनाच्या 'एमएसआरटीसी'सारख्या संस्थेकडे जीपीएस ट्रॅकिंग किंवा प्रवासी माहिती प्रणाली नाही, हे आश्चर्य आहे. प्रवाशांना अचूक व वेळेवर माहिती मिळावा हा त्यांचा अधिकार आहे. मात्र, याकडे प्रशासनाचे कमालीचे दुर्लक्ष आहे.

– **आशिष चौधरी**, सचिव, रोटरी क्लब, अमळनेर.

# अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना पुन्हा अवकाळीचा फटका...!

## पांढऱ्या सोन्याच्या झाल्या अक्षरशः ' वाती '...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यात गेल्या दोन दिवसांपूर्वी झालेल्या अवकाळी पावसाने पुन्हा शेतकऱ्यांना फटका बसला आहे. शेतकऱ्यांचे उरलेसुरले उत्पन्नही धोक्यात आले आहे. यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. कापूस गळून अक्षरशः वाती झाल्या आहेत.अवकाळी पावसामुळे कापसाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे अनेक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. ऐन दिवाळीच्या सणासुदीला हे संकट ओढवले आहे. त्यांच्या तोंडाचा घास हिरावला गेला आहे. शेतकऱ्याच्या पदरी पुन्हा नैराश्य आले आहे. यावर्षी मजुरी, खत आणि औषधांचे दरही प्रचंड वाढले होते. पावसाने सर्व मेहनत वाया गेल्याने शेतकरी व्यथित झाले आहेत. मजूर नसल्याने शेतातील कापूस वेळेवर गोळा करता आला नाही. ऐन मोक्याच्या वेळी पावसाची गैरहजेरी आणि त्यानंतर ऑगस्टमधील अतिवृष्टीमुळे खरीप हंगामातील पिकांचा बोजवारा उडाला होता. अतिवृष्टीची मदत न मिळाल्याने आधीच संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता पुन्हा अवकाळीने कर्जाच्या खाईत लोटले आहे. उरलेसुरले उत्पादन घेता येईल, आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या पान ३ वर

"शेतीची कामे सुरू असून मका कनिस मोडून बांधावर पडला आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे तो ओला होऊन खराब झाला आहे. कापसाची बोंडेही गळून पडली आहेत. हाती येऊन तो कापूस वेचण्यासाठी मजूर देखील मिळेनासे झाले आहेत. कर्ज फेडण्यासाठी पुढे काय करावे? अशी चिंता आता भेडसावत आहे.

– **महेंद्र भिका बोरसे**, शेतकरी, मंगरूळ.







# मिठाईऐवजी सुका मेवा गिफ्ट करताना ‘ या ’ गोष्टी बघाच..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मिठाईऐवजी सुका मेवा गिफ्ट करताना अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे. बनावट काजूच्या दीर्घकाळ सेवनाने आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात.
- पोटात जळजळ, आम्लता.
- त्वचेला ॲलर्जी, खाज (कृत्रिम रंगांमुळे).
- यकृत आणि मूत्रपिंडाच्या समस्या (विषारी पदार्थ जमा होतात).

यासाठी खरेदीपूर्वी चाचणी अनिवार्य.
बनावट ड्रायफ्रूट्स कसे ओळखायचे? (सोपी लिटमस टेस्ट)
तुम्हाला लिटमस पेपर लागेल (बाजारात स्वस्त:त मिळते).

**काजूची चाचणी**
१) काजूच्या तुकड्यावर थोडे पाणी ओता.
२) त्यावर लिटमस पेपर लावा.

| परिणाम | अर्थ |
|---|---|
| रंगलाल/नारंगी झाला | बनावट(आम्ल किंवा केमिकल वापरले) |
| रंग बदलला नाही | खरा (सुरक्षित) |

**इतर ड्रायफ्रूट्ससाठी टिप्स**

| ड्रायफ्रूट | खरे विरुद्ध बनावट ओळख |
|---|---|
| बदाम | **खरे :** नैसर्गिक तेलकट, हलके गडद रंग |
| | **बनावट :** अतिशय चमकदार, कृत्रिम चमक |
| किसमिस | **खरे :** नैसर्गिक गोड, थोडे चिकट |
| | **बनावट :** अतिशय चमकदार, केमिकल गंध |
| अक्रोड | **खरे :** नैसर्गिक आकार, हलके कडू |
| | **बनावट :** एकसमान आकार, कृत्रिम चमक |

**खरेदी टिप्स**
१) विश्वासार्ह दुकानातून घ्या.
२) पॅकिंगवर लेबल तपासा : निर्मिती तारीख, घटक.
३) अतिशय स्वस्त असतील तर संदेह घ्या.
४) घरी आल्यावर चाचणी करा.
सणासुदीत आरोग्यदायी भेट द्या. पण खरी द्या.
**बनावट सुका मेवा टाळा, आरोग्य वाचवा!**

# भारतातील ‘ ही ’ एकमेव नदी उलटी का वाहते?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील उलट्या दिशेने (पूर्व ते पश्चिम) वाहणारी एकमेव प्रमुख नदी कोणती आहे? ती उलट्या दिशेने वाहण्यामागचे कारण काय? जाणून घेऊया...

**पूर्व ते पश्चिम वाहणारी एकमेव नदी : नर्मदा**
भारतातील बहुतेक प्रमुख नद्या पूर्वेकडे (बंगालच्या उपसागराकडे) वाहतात. मात्र, नर्मदा नदी ही एकमेव प्रमुख नदी आहे जी पूर्व ते पश्चिम दिशेने वाहते आणि अरबी समुद्राला मिळते.

**उलट्या दिशेने वाहण्यामागची कारणे**
१) रिफ्ट व्हॅली (भेगांची दरी)
नर्मदा नदी रिफ्ट व्हॅलीमध्ये वाहते.
ही दरी पृथ्वीच्या कवचातील भेगा पडल्यामुळे तयार झाली.
या दरीचा नैसर्गिक उतार पूर्वेकडून पश्चिमेकडे आहे.

२) नैसर्गिक उतार आणि गुरुत्वाकर्षण
नदी नेहमी उंचावरील उताराकडे वाहते.
नर्मदेच्या खोऱ्याचा उतार पूर्व ते पश्चिम असल्याने ती त्या दिशेने वाहते.
दख्खन पठाराचा सामान्य उतार पूर्वेकडे असला तरी, नर्मदेची रिफ्ट व्हॅली हा अपवाद आहे.

३) अरबी समुद्राकडे वाहणे
भारतातील बहुतेक नद्या बंगालच्या उपसागराला मिळतात.
नर्मदा मात्र पश्चिम वाहिनी असल्याने अरबी समुद्राला मिळते.

४) मुखाची खाडी, डेल्टा नव्हे
नर्मदा रिफ्ट व्हॅलीत वेगाने वाहते.
सपाट मैदान नसल्याने गाळ जमा होत नाही.
म्हणून ती डेल्टा बनवत नाही, तर मुखाची खाडी तयार करते.

**पौराणिक कथा**
नर्मदा मातेचा विवाह शोनभद्र (सोन नदी) याच्याशी ठरला होता. शोनभद्रच्या विश्वासघातामुळे नर्मदा संतापली. तिने विपरीत दिशेने वाहण्याचा निर्णय घेतला.
म्हणून ती उलट्या दिशेने वाहते, अशी मान्यता आहे.



**थोडक्यात**

| वैशिष्ट्य | नर्मदा नदी |
|---|---|
| दिशा | पूर्व पश्चिम |
| खोरे | रिफ्ट व्हॅली |
| उतार | पूर्व ते पश्चिम |
| समुद्र | अरबी समुद्र |
| मुख | खाडी |

नर्मदा ही भारतातील एकमेव प्रमुख नदी आहे जी भौगोलिक रचनेमुळे आणि नैसर्गिक उतारामुळे उलट्या दिशेने वाहते.



# सणासुदीत देशभरात रोज एक लाखावर वाहनांची विक्री!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

केंद्र सरकारने दुचाकी आणि चारचाकी संवर्गातील कमी क्षमतेच्या वाहनांवरील वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) कमी केल्याचा सकारात्मक परिणाम दिसून येत आहे. यंदाच्या सणासुदीत देशात रोज एक लाखावर सर्व संवर्गातील वाहनांची विक्री नोंदविली जात आहे.

**नागपूर :** केंद्र सरकारने दुचाकी व कमी क्षमतेच्या चारचाकी वाहनांवरील जीएसटी कमी केल्याने वाहनांच्या किंमती सुमारे १० टक्क्यांनी कमी झाल्या आहेत. त्यामुळे ऑटोमोबाईल क्षेत्राला सुगीचे दिवस आले आहेत. ऑक्टोबर २०२५ मधील पहिल्या २२ दिवसांतच देशात २३ लाख ५४ हजार २२५ वाहनांची विक्री झाली आहे.



देशात जानेवारी ते २२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान एकूण २ कोटी ११ लाख १९ हजार ८४७ वाहनांची विक्री नोंदविली गेली. यातील जानेवारी २०२५ मध्ये २३ लाख २१ हजार ६३२ वाहने विकली गेली. जी फेब्रुवारीत घसरून १९ लाख २३ हजार १३० झाली. एप्रिल २०२५ मध्ये पुन्हा विक्री वाढून २३ लाख १७ हजार ४५० वर पोहोचली. मे ते सप्टेंबर या कालावधीत दरमहा १८.४४ लाख ते २० लाख दरम्यान विक्री नोंदविली गेली. मात्र, सणासुदीच्या काळात ऑक्टोबरमध्ये दसरा, धनत्रयोदशी आणि दिवाळीच्या निमित्ताने नागरिकांनी मोठ्या प्रमाणात दुचाकी, चारचाकी तसेच इतर संवर्गातील वाहने खरेदी केली. या काळात २३ लाख ५४ हजार २२५ वाहनांची विक्री झाली. रोजची सरासरी काढल्यास १ लाख ७ हजार १० वाहने विकली गेली, अशी माहिती केंद्र सरकारच्या भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्या ‘ वाहन ’ संकेतस्थळावरील आकडेवारीतून समोर आली आहे.

**सर्व संवर्गातील वाहनांच्या विक्रीची आकडेवारी (वर्ष २०२५)**

| महिना (२०२५) | विक्री (संख्या) |
|---|---|
| जानेवारी | २३,२१,६३२ |
| फेब्रुवारी | १९,२३,१३० |
| मार्च | २१,५५,३२२ |
| एप्रिल | २३, १७,४५० |
| मे | २२,३५,९४८ |
| जून | २०,२४,८२० |
| जुलै | १९,८२,३२८ |
| ऑगस्ट | १९,८५,१४० |
| सप्टेंबर | १८,४५,५८३ |
| ऑक्टोबर | २३,५४,२२५ |

(टीप : ऑक्टोबरची आकडेवारी १ ते २२ ऑक्टोबर २०२५ पर्यंतची आहे.)

**सक्सेस स्टोरी**

# डिस्कळच्या दीपालीने मिळविले राज्यात पहिले स्थान; जुळ्या बहिणींची ऐतिहासिक कामगिरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सर्वोच्च यश मिळविण्याची व्याख्या प्रत्येकासाठी वेगळी आहे. त्यामागचा मार्ग नेहमीच जिद्द, संघर्ष आणि मेहनतीचा असतो. अशाच मार्गावर एकमेकींशी निकोप स्पर्धा करीत पुढे जात असलेल्या दोन सख्ख्या जुळ्या बहिणींनी उत्तुंग यश गाठले आहे. खटाव तालुक्यातील डिस्कळ येथील दीपाली दशरथ कर्णे यांनी यूपीएससी परीक्षा क्रॅक करून भारतीय सांख्यिकी सेवा (आयएसएस) विभागात वर्ग एकचे पद मिळविले आहे. राज्यात पहिली, तर देशात २४ वी येण्याचा बहुमान दीपाली यांनी मिळविला. विशेष म्हणजे दीपाली यांची जुळी बहीण रूपाली यांनी २०२१ मध्ये याचच पदाला गवसणी घातली होती. रूपाली यांच्यापाठोपाठ दीपाली यांनी यूपीएससीत अनोखी कामगिरी बजावली आहे.

डिस्कळ येथील दशरथराव कर्णे यांच्या लहान दोन जुळ्या मुलींनी पाठोपाठ संघ लोकसेवा आयोगामार्फत घेतलेल्या भारतीय सांख्यिकी सेवा परीक्षेत यश मिळवत यशाचे सर्वोच्च शिखर पादाक्रांत केले आहे. दीपाली आणि रूपाली कर्णे या दोघी स्पर्धा परीक्षांद्वारे यश मिळविण्याची स्वप्ने पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आदर्शवत ठरल्या आहेत. दशरथ कर्णे यांना योगेश हा मोठा मुलगा आहे. जो सध्या एका महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. कर्णे यांना तीन मुली आहेत. मोठ्या मुलीचे लग्न होऊन ती सेटल झाली आहे.



**शैक्षणिक प्रवास अन् यशाची सुरूवात**

लहान रूपाली आणि दीपाली या दोन जुळ्या बहिणी लहानपणापासूनच अभ्यासात हुशार होत्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या डिस्कळ आणि सोळांकूर (जि. कोल्हापूर) येथील शाळांमध्ये झाले. माध्यमिक शिक्षणही त्यांनी तेथेच पूर्ण केले. लहानपणापासूनच दोघींनी शिष्यवृत्ती, दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षांमध्ये अव्वल दर्जाचे यश मिळविले. वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्या सातारा जिल्ह्यात आल्या. यशवंतराव चव्हाण शास्त्र महाविद्यालयात त्यांनी सांख्यिकी (संख्याशास्त्र) विषयात पदवी प्राप्त केली. त्यानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी त्या शिवाजी विद्यापीठात दाखल झाल्या. या काळातच त्यांनी सर्वोच्च यश मिळविण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन देशातील सर्वांत कठीण असलेल्या यूपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. एम.एस्सी. अव्वल गुणांनी उत्तीर्ण झाल्यानंतर ध्येयवेड्या कर्णे भगिनी सेट परीक्षेतही टॉपर ठरल्या. २०२१ मध्ये रूपाली यांनी यूपीएससी परीक्षेत राज्यात पहिले, तर देशात पाचवे स्थान मिळविले. त्यांची भारतीय सांख्यिकी विभागात वर्ग एकच्या अधिकारीपदी निवड झाली.

> माझा प्रवास खूप खडतर होता. परंतु मी हार मानली नाही. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मी एवढेच सांगू इच्छिते, की कष्ट करण्याची तयारी ठेवा. सातत्य आणि चिकाटी हेच यशाचे गमक आहे. माझ्या यशात माझ्या कुटुंबाचा खूप मोठा वाटा आहे. माझे आई-वडील, भाऊ आणि बहिणींनी मला मोलाची साथ दिली. अपयशाने खचून न जाता पुन्हा प्रयत्न करण्याची त्यांच्याकडून मला प्रेरणा मिळाली.
>
> **- दीपाली कर्णे**
> **(आयएसएस अधिकारी)**

दरम्यानच्या काळात दीपाली यांचेही प्रयत्न सुरू होते. त्यांच्या प्रयत्नांनाही यश लाभले. त्या राज्यात पहिल्या आणि देशात २४ व्या क्रमांकावर आल्या आहेत. सध्या दीपाली आरोग्य विभागात सांख्यिकी अन्वेषक म्हणून कार्यरत आहेत. कर्णे कुटुंबातील दोन जुळ्या बहिणी क्लास वन अधिकारी झाल्याने डिस्कळ गावात आनंदोत्सवाचे वातावरण आहे. अनेकांकडून कर्णे कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षावही होत आहे.

# देशातील सर्वांत मोठी रेड : नोटा मोजता-मोजता अधिकाऱ्यांना फुटला घाम!





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रितेनकुमार सिंह भ्रष्टाचार प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यावर केंद्रीय अन्वेषण खात्याने मोठी कारवाई केली आहे. गुवाहाटी येथे १० लाख रुपयांची लाच स्वीकारताना या अधिकाऱ्याला अटक करण्यात आली. मात्र, त्यानंतर झालेल्या छाप्यांमध्ये कोट्यवधींची रोकड आणि मालमत्ता उघडकीस आली. ज्यामुळे तपास यंत्रणाही चक्रावल्या.

**दहा लाखांची लाच आणि सीबीआयचे जाळे**

सीबीआयला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हा सापळा रचण्यात आला. राष्ट्रीय महामार्ग आणि पायाभूत सुविधा विकास महामंडळाच्या गुवाहाटी येथील प्रादेशिक कार्यालयाचे कार्यकारी संचालक मैसनाम रितेनकुमार सिंह याला १४ ऑक्टोबर २०२५ रोजी अटक करण्यात आली. एका खासगी कंपनीला चालू प्रकल्पात मदत करण्याच्या बदल्यात तो ही रक्कम स्वीकारत होता. ही लाच आसाममधील राष्ट्रीय महामार्ग-३७ (एनएच-३७) वरील फोर-लेनिंग प्रकल्पासाठी मागण्यात आली होती. प्रकल्पाची मुदत वाढवणे आणि काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी ही रक्कम स्वीकारताना सीबीआयने सिंह याला मुद्देमालासह पकडले. या कारवाईसोबतच प्रकरणाशी संबंधित व्यावसायिक बिनोदकुमार जैन (कोलकाता येथील मे. मोहनलाल जैन कंपनीचे प्रतिनिधी) यांच्या कार्यालय आणि घरांवरही छापे टाकण्यात आले.

**नोटा मोजताना मशीन थकली**

बेहिशेबी मालमत्ता उघड अटकेनंतर सीबीआयने गुवाहाटी, गाझियाबाद आणि इम्फाळ येथील सात ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत सापडलेल्या ऐवजामुळे अधिकाऱ्यांच्या हाती घाम फुटला. घरातूनच २.६२ कोटी रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. ही रक्कम इतकी मोठी होती की नोटा मोजण्यासाठी आणलेली मशीन गरम झाली आणि अधिकाऱ्यांचे हात थकले, तरी नोटा संपत नव्हत्या. याशिवाय चांदीच्या विटा आणि दोन महागडी घड्याळेही जप्त झाली. रोख रकमेव्यतिरिक्त सिंह आणि कुटुंबीयांच्या नावावर असलेल्या कोट्यवधींच्या मालमत्तेची कागदपत्रेही सापडली. यामध्ये-

**दिल्ली-एनसीआर :** ९ लक्झरी फ्लॅट्स, १ ऑफिस आणि ३ प्लॉट्स
**बंगळुरू :** १ फ्लॅट आणि १ प्लॉट
**गुवाहाटी:** ४ फ्लॅट्स आणि २ प्लॉट्स
**इम्फाळ पश्चिम :** २ भूखंड आणि शेतजमिनी

तसेच ६ आलिशान वाहनांमधील गुंतवणुकीची कागदपत्रेही सीबीआयने जप्त केली. तपास यंत्रणांना या मालमत्तेचे बाजारमूल्य कागदोपत्री मूल्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त असल्याचा संशय आहे. दोघांना गुवाहाटी येथील विशेष सीबीआय न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. तपास सुरू असून, या प्रकरणाचा व्याप्ती मोठी असल्याचे सीबीआय सांगते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी

## आमदार अनिलदादा पाटील यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांना साकडे

**ग्लोबल महातेज अमळनेर**

सततच्या मुसळधार पावसामुळे अमळनेर मतदारसंघासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. बळीराजाच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री कृषिमंत्री तसेच मदत व पुनर्वसन मंत्री यांना निवेदन दिले. उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार व कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांची प्रत्यक्ष भेटही घेतली. तत्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणीही त्यांनी केली. निवेदनात म्हटले आहे, की खरीप हंगामाच्या सुरुवातीला पावसाने दडी मारली होती. त्यानंतर झालेली अतिवृष्टी आणि अखंड पाऊस यामुळे बळीराजाचा हंगाम पूर्णतः हातातून गेला आहे. सध्या झालेल्या अवकाळी पावसामुळे काढणीला आलेली पिकेही नष्ट झाली आहेत. अमळनेर मतदारसंघातील एकूण ८१ हजार २१२ हेक्टर लागवडीखाली आहे. या क्षेत्रापैकी ४६ हजार ९४८ हेक्टरवरील कपाशी, २९ हजार ४१२ हेक्टरवरील मका, ३ हजार ५४४ हेक्टरवरील ज्वारी, ७४७ हेक्टरवरील बाजरी आणि २०० हेक्टरवरील सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शासनाच्या निकषानुसार फक्त उभ्या पिकांचाच पंचनामा केला जातो. मात्र, अवकाळी पावसामुळे कापणी झालेली पिकेही शेतात पाण्याखाली गेली आहेत. त्यामुळे कापणी झालेल्या मका, ज्वारी, बाजरी व सोयाबीन पिकांचेही पंचनाम्यांचे आदेश द्यावेत. शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळावी. शेतकऱ्यांचे नुकसान लक्षात घेऊन शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अन्यथा बळीराजाच्या आयुष्यातील संकट अधिक गंभीर बनेल असेही निवेदनात म्हटले आहे.



# दणकून केला दिवाळी फराळ, आता ॲसिडिटीने काढला जाळ !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळीच्या उत्साहात गोड-तिखट फराळाचे पदार्थ चवीने सेवन केले जात असले तरी त्यामुळे पोटात जळजळ, आम्लपित्तची समस्या भेडसावते. तेलकट, तुपकट, मसालेदार पदार्थांचे अति सेवन, कमी पाणी पिल्यामुळेही ॲसिडिटी वाढते असे तज्ज्ञ सांगतात.

**ही आहेत लक्षणे**

ॲसिडिटीची लक्षणे म्हणजे छातीत जळजळ, ढेकर येणे, पोटात गॅस होणे, मळमळ किंवा भूक मंदावणे. दिवाळीच्या काळात ही समस्या मोठ्या प्रमाणात वाढते. कारण फराळातील चिवडा, लाडू, करंज्या, चकल्या यासारख्या पदार्थांमध्ये तेल आणि मसाल्याचे प्रमाण जास्त असते.

**लिंबाचा रस उपयोगी**

ॲसिडिटीवर नियंत्रण ठेवण्यासाठी काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास मोठा फरक पडतो. सकाळी कोमट पाण्यात थोडे मध आणि लिंबाचा रस घेणे. दिवसातून वेळेवर हलके पण पौष्टिक अन्न घेणे. पाण्याचे सेवन वाढवणे आणि जास्त वेळ उपाशी न राहणे हे आवश्यक आहे. झोपेच्या दोन तासांपूर्वी जेवण करून घ्यावे आणि लगेच झोपण्याऐवजी थोडे चालावे.

**जीवनशैलीत बदल करा**

घरगुती उपायांमध्ये ताजे ताक, ओवा, केळे, गुळपाणी आणि कोरफडीचा रस उपयोगी ठरतो. औषधोपचारापेक्षा जीवनशैलीत बदल केल्यास ॲसिडिटीवर कायमचा तोडगा निघू शकतो.

**नियमित व्यायाम करावा**

सणाचा आनंद घेताना आरोग्याकडे दुर्लक्ष न करता मर्यादित फराळाचे सेवन, नियमित व्यायाम आणि पुरेशी झोप घेतल्यास ॲसिडिटीपासून सहज बचाव करता येतो. त्यामुळे ‘सण साजरा करा पण संयमाने’ हा संदेश यंदाच्या दिवाळीत लक्षात ठेवण्यासारखा आहे.



> यावर्षी दिवाळी लवकर म्हणजे ऑक्टोबर मध्ये आली तसेच शरद ऋतू मध्ये वातावरण उष्ण असते आणि आपल्या शरीरातील पित्त सुद्धा वाढलेले असते बाहेरून आणलेला तयार फराळ हा अति तिखट, मसालेदार आणि तेल, बेसन हे भेसळ युक्त तसेच रंग टाकलेला प्रेसेर्वेटिव्ह टाकलेला असण्याची शक्यता पाहता टाळावा.
>
> **डॉ. सौ. लीनाताई अतुल चौधरी** (आयुर्वेदाचार्य पंचकर्मतज्ज्ञ)



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

पान १ वरून...

### अमळनेरला आज कार्यकर्ता मेळावा

दरम्यान, जनतेच्या विश्वासावर आणि विकासाच्या बळावर अमळनेर तालुका शहर विकास आघाडी तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या दोन्ही पक्षातर्फे कार्यकर्ता मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या दृष्टीने हा मेळावा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. मेळाव्यास शहर विकास आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व कार्यकर्ते, बूथ कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### ऑनलाईन प्रणालीचा बोजवारा!

याबाबत रोटरी क्लबचे सचिव आशिष चौधरी यांनी तक्रार दाखल केली आहे. श्री. चौधरी यांनी सोमवार, दि. २७ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता बससाठी दोन ऑनलाईन तिकिट बुक केले होते. मात्र, बसच्या स्थितीबाबत कोणतीही माहिती चौकशी विभागाकडे उपलब्ध नव्हती. विचारणा केली असता “ गाडी येईल की नाही, याची खात्री नाही ” असेच उत्तर मिळाले.

**ऑनलाईन तिकीट, मात्र ऑफलाईन अडचणी**

११ ते १ वाजून ५० मिनिटांपर्यंत प्रवाशांनी प्रतिक्षा केली. तिकीट रद्द करण्यासाठी काउंटरवर गेले. एक ते दोन लंच ब्रेक असल्याने कामकाज पूर्णपणे बंद होते. परिणामी प्रवाशांना पर्यायी बस शोधून प्रवास करावा लागला. यानंतर साडेअकरा वाजेची बस दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी आली आणि परत गेली. या काळात प्रवाशांना बसची कोणतीही माहिती स्क्रीन, फलक किंवा डिजिटल स्क्रोलिंगवर देण्यात आली नव्हती. ऑनलाईन तिकिट बुकींग होते. मात्र, ऑफलाईन कुठलीच माहिती उपलब्ध नसते, अशी नाराजी प्रवाशांनी व्यक्त केली.

**तक्रार वही उपलब्ध नाही**

धक्कादायक बाब म्हणजे चौकशी विभागात तक्रार नोंदवण्यासाठी विचारले असता “ तक्रार वहीच उपलब्ध नाही” असे उत्तर मिळाले. आगार प्रमुखांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी “पाच मिनिटांत येतो” असे सांगूनही दीर्घकाळ अनुपस्थित राहिले.

**प्रवाशांच्या उद्रेक**

घटनेच्या वेळी बसस्थानकावर उपस्थित इतर प्रवाशांनाही अशाच प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागले. काही प्रवाशांनी ऑनलाईन बुकिंग असूनही बस “रद्द” झाल्याची माहिती मिळाल्याने संताप व्यक्त केला. या प्रकरणी संबंधितांनी तत्काळ चौकशी करावी. बस ट्रॅकिंग व्यवस्था लागू करावी. प्रत्येक आगारात डिजिटल स्क्रोलिंग व ऑनलाईन अपडेट्स सुरू करावेत. तक्रार नोंदवही व ऑनलाईन हेल्पडेस्क सक्रीय करावेत, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

# अर्बन बँकेत मोबाईल बँकिंग सुविधा उपलब्ध

## ग्राहकांना घरबसल्या करता येणार डिजिटल व्यवहार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्याची आर्थिक जीवनदायी अशी ओळख असणाऱ्या येथील अमळनेर अर्बन बँकेद्वारा लवकरच मोबाईल बँकिंग सुविधा कार्यान्वित केली जात आहे, मोबाईल बँकिंग व्यवहाराची प्राथमिक नुकतीच यशस्वी झाली आहे. ग्राहकांसाठी अल्प कालावधीस ही सुविधा बँकेद्वारा उपलब्ध करून दिल्यानंतर ग्राहकांना घरबसल्या मोबाईलद्वारे डिजिटल व्यवहार करता येणार आहेत.

याच सोबत आयएमपीएस, यूपीआय या प्रकारच्या डिजिटल सेवा कार्यान्वित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे .या सुविधा ग्राहकांसाठी लवकर उपलब्ध होतील असा विश्वास बँकेने व्यक्त केला आहे. सभासदांना १० टक्के लाभांश वाटप बँकेच्या संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभांमध्ये सभासदांना वेळोवेळी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केलेली आहे. त्यानुसार मार्च २०२५ करिता सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.ज्या सभासदांचे बँकेत सेव्हिंग, करंट, कर्ज यापैकी कोणतेही खाते असेल त्यांच्या लाभांशाची रक्कम थेट त्यांच्या खात्यात जमा करण्यात आली आहे. ज्या सभासदांचे खाते नाहीत त्यांच्या लाभांशाची रक्कम एक नोव्हेंबर पासून केवायसी पूर्तता केल्यानंतर लगेच वितरित करण्यात येणार आहे.



बँकेला निरंतर प्रगतीपथावर नेण्या बरोबरच चालू आर्थिक वर्षात बँकेचा नेट एनपीए शून्य टक्के करण्याचे उद्दिष्ट सर्व संचालक मंडळाने निश्चित केले आहे अशी माहिती बँकेचे चेअरमन भरतकुमार सुरेश ललवाणी यांनी दिली. यावेळी व्हा. चेअरमन लक्ष्मण महाजन, संचालक प्रवीण जैन, पंकज मुंदडे,प्रदीप अग्रवाल, दीपक साळी,अभिषेक पाटील, प्रवीण पाटील, पंडित चौधरी, मोहन सातपुते,रणजित शिंदे,सौ. वसुंधरा लांडगे, डॉ. सौ. मनीषा लाठी यांचे सह तज्ज्ञ संचालक ॲड.व्ही. आर.पाटील व ॲड.विजय बोरसे उपस्थित होते.

पान १ वरून...

### अमळनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना पुन्हा अवकाळीचा फटका...!

पिकांची पुर्णपणे वाट लागली आहे. कापूस, मका, सोयाबीन, ज्वारी तसेच फळबागातील केळी यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतशिवारात मोडून पडलेली पिके पाहून शेतकरी हतबल झाले आहेत. सद्यस्थितीत मका व सोयाबीन या पिकांना अपेक्षित हमीभाव मिळालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी भाव चांगला मिळेल या आशेने ही पिके कापून बांधावर ठेवली होती. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसामुळे ही पिकेही पूर्णपणे भिजली आहेत. तालुक्यातील मारवड, भरवस तसेच वावडे या मंडळांमध्ये जोरदार वादळी पाऊस झाला. काही मिनिटांतच शेतांमधून पाणी वाहू लागले. मंगरूळ– शिरुड परिसरात देखील मोठे नुकसान झाले आहे. वादळी वाऱ्यामुळे आणि पावसामुळे शहर तसेच ग्रामीण भागातील विद्युतपुरवठाही बराच वेळ खंडित झाला होता.

# गटारी ओसंडून रस्त्यावर वाहतेय सांडपाणी...!

## नागरिक त्रस्त ; शिरूड ग्रामपंचायतीचे दुर्लक्ष !

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील शिरुड येथे दोन दिवसांच्या अवकाळी पावसाने गटारी तुंबल्या आहेत. गटारीतील सांडपाणी ओसंडून रस्त्यावर आले आहे. सर्वत्र चिखलही साचला आहे. यामुळे परिसरातील दुर्गंधीने नागरिक हैराण झाले आहेत. ग्रामस्थांचे आरोग्यही धोक्यात आले आहे. याकडे ग्रामपंचायतीचे दूर्लक्ष आहे. गटारीतील सांडपाण्याचा निचरा करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

काही गल्ल्यांमधील गटारी पूर्णतः ब्लॉक झाल्या आहेत. परिणामी नागरिकांना घराबाहेर पडणेही मुश्किल झाले आहे. पावसामुळे परिसरातील रस्ते चिखलमय झाले आहेत. ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाचा फटका नागरिकांना बसला आहे.

वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायतीकडून नालेसफाई होत नाही. सांडपाण्याचा निचरा नसल्याने डासांची उत्पत्तीही वाढली आहे. यामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे. संबंधितांनी प्रत्यक्ष पाहणी करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.



> गावातील गटारींची परिस्थिती अतिशय दयनीय आहे. घाणीमुळे काही घरांमध्ये जंतू व सर्प आढळले. दुर्गंधीमुळे ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. याबाबत वारंवार तक्रारी करूनही ग्रामपंचायत उपाययोजना करण्यास तयार नाही. त्यांच्या हलगर्जीपणामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आहे.
>
> **– मधुर पाटील, ग्रामस्थ, शिरुड.**


ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची

सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले

महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!

डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**

शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.






# चौदा विद्या अन् चौसष्ठ कला यांचे अधिपती : गणपती बाप्पा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू संस्कृतीतील आराध्य दैवत म्हणजे श्री गणपती. या लाडक्या श्री गणपती यांना चौदा विद्या आणि चौसष्ठ कला यांचा अधिपती असे म्हटले जाते. साहजिकच या चौदा विद्या आणि चौसष्ठ कला कोणत्या? याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता असते. याविषयी...

### चौदा विद्या

चार वेद + सहा वेदांगे + न्याय, मीमांसा, पुराणे व धर्मशास्त्र अशा एकूण चौदा विद्या आहेत.

वेद : १) ऋग्वेद २) यजुर्वेद ३) सामवेद ४) अथर्ववेद

### सहा वेदांगे

१) व्याकरण- भाषेतील शब्दांच्या व्यवहाराचे शास्त्र.
२) ज्योतिष- ग्रहगती तथा सामुद्रिक जाणण्याची विद्या.
३) निरुक्त- वेदांतील कठीण शब्दांचे अर्थ सांगणारे शास्त्र.
४) कल्प- धार्मिक विधी- व्रतांचे वर्णन करणारे शास्त्र.
५) छंद- शब्दांची गानयोग्य रचना व काव्यवृत्ताचे ज्ञान.
६) शिक्षा- शिक्षण, अध्यापन व अध्ययन.

### चौसष्ट कला

१) पानक रस तथा रागासव योजना - मद्यपान व पेय तयार करणे.
२) धातुवद- कच्ची धातू पक्की व मिश्रधातू वेगळी करणे.
३) दुर्वाच योग- कठीण शब्दांचा अर्थ लावणे.
४) आकर ज्ञान - खाणींविषयी अंतर्गत सखोल ज्ञान असणे.
५) वृक्षायुर्वेद योग- उपवन, कुंज, वाटिका, उद्यान बनविणे.
६) पट्टिका वेत्रवाणकल्प- नवार, सुंभ, वेत इत्यादींनी खाट विणणे.
७) वैनायिकी विद्याज्ञान- शिष्टाचार व विनय यांचे ज्ञान असणे.
८) व्यायामिकी विद्याज्ञान- व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान असणे.
९) वैजापिकी विद्याज्ञान- दुसऱ्यावर विजय मिळविणे.
१०) शुकसारिका प्रलापन- पक्ष्यांची बोली जाणणे.
११) अभिधान कोष छंदोज्ञान- शब्द व छंद यांचे ज्ञान असणे.
१२) वास्तुविद्या- महाल, भवन, राजवाडे, सदन बांधणे.
१३) बालक्रीडाकर्म- लहान मुलांचे मनोरंजन करणे.
१४) चित्र शब्दापूपभक्षविपाक क्रिया- पाकक्रिया, स्वयंपाक करणे.
१५) पुस्तक वाचन- काव्यगद्यादी पुस्तके व ग्रंथ वाचणे.
१६) आकर्षण क्रीडा- दुसऱ्याला आकर्षित करणे.
१७) कौचुमार योग- कुरुप व्यक्तीला लावण्यसंपन्न बनविणे.
१८) हस्तलाघव- हस्तकौशल्य तथा हातांनी कलेची कामे करणे.
१९) प्रहेलिका - कोटी, उखाणे वा काव्यातून प्रश्न विचारणे.
२०) प्रतिमाला - अंत्याक्षराची योग्यता ठेवणे.
२१) काव्यसमस्यापूर्ती - अर्धे काव्य पूर्ण करणे.
२२) भाषाज्ञान - देशी-विदेशी बोलींचे ज्ञान असणे.
२३) चित्रयोग - चित्रे काढून रंगविणे.
२४) कायाकल्प - वृद्ध व्यक्तीला तरुण करणे.
२५) माल्यग्रंथ विकल्प - वस्त्रप्रावरणांची योग्य निवड करणे.
२६) गंधयुक्ती - सुवासिक गंध वा लेप यांची निर्मिती करणे.
२७) यंत्रमातृका - विविध यंत्रांची निर्मिती करणे.
२८) अत्तर विकल्प - फुलांपासून अर्क वा अत्तर बनविणे.
२९) संपाठ्य - दुसऱ्याचे बोलणे ऐकून जसेच्या तसे म्हणणे.
३०) धारण मातृका - स्मरणशक्ती वृद्धिंगत करणे.
३१) छलीक योग- चलाखी करून हातोहात फसविणे.
३२) वस्त्रगोपन- फाटकी वस्त्रे शिवणे.
३३) मणिभूमिका - भूमीवर मण्यांची रचना करणे.
३४) द्यूतक्रीडा - जुगार खेळणे.
३५) पुष्पशकटिका निमित्त ज्ञान - प्राकृतिक लक्षणाद्वारे भविष्य सांगणे.
३६) माल्यग्रथन - वेण्या, पुष्पमाला, हार, गजरे बनविणे.
३७) मणिराग ज्ञान - रंगावरून रत्नांची पारख करणे वा ओळखणे.
३८) मेषकुक्कुटलावक - युद्धविधी- बोकड, कोंबडा इ.च्या झुंजी लावणे.
३९) विशेषकच्छेद ज्ञान - कपाळावर लावायच्या तिलकांचे साचे करणे.
४०) क्रिया विकल्प - वस्तूच्या क्रियेचा प्रभाव उलटविणे.
४१) मानसी काव्यक्रिया - शीघ्र कवित्व करणे.
४२) आभूषण भोजन - सोन्या-चांदी वा रत्नामोत्यांनी काया सजवणे.
४३) केशशेखर पीड ज्ञान - मुकुट बनविणे व केसात फुले माळणे.
४४) नृत्यज्ञान - नाचाविषयीचे शास्त्रोक्त सखोल ज्ञान असणे.
४५) गीतज्ञान - गायनाचे शास्त्रीय सखोल ज्ञान असणे.
४६) तंडुल कुसुमावली विकार - तांदूळ व फुलांची रांगोळी काढणे.
४७) केशमार्जन कौशल्य - मस्तकाला तेलाने मालीश करणे.
४८) उत्सादन क्रिया - अंगाला तेलाने मर्दन करणे.
४९) कर्णपत्र भंग - पानाफुलांपासून कर्णफुले बनविणे.
५०) नेपथ्य योग - ऋतुकालानुसार वस्त्रालंकाराची निवड करणे.
५१) उदकघात - जलविहार करणे. रंगीत पाण्याच्या पिचकारी करणे.
५२) उदकवाद्य - जलतरंग वाजविणे.
५३) शयनरचना - मंचक, शय्या व मंदिर सजविणे.
५४) चित्रकला - नक्षी वेलवुट्टी व चित्रे काढणे.
५५) पुष्पास्तरण - फुलांची कलात्मक शय्या करणे.
५६) नाट्यआख्यायिका दर्शन - नाटकांत अभिनय करणे.
५७) दशनवसनांगरात - दात, वस्त्रे, काया रंगविणे वा सजविणे.
५८) तुर्ककर्म - चरखा व टकळीने सूत काढणे.
५९) इंद्रजाल - गारुडविद्या व जादूटोणा यांचे ज्ञान असणे.
६०) तक्षणकर्म - लाकडावर कोरीव काम करणे.
६१) अक्षर मुष्टिका कथन - करपल्लवीद्वारे संभाषण करणे.
६२) सूत्र तथा सूचीकर्म - वस्त्राला रफू करणे.
६३) म्लेंछीतकला विकल्प - परकीय भाषा ठाऊक असणे.
६४) रत्नरौप्य परीक्षा - अमूल्य धातू व रत्ने यांची पारख करणे.



# रक्षाबंधन अन् भाऊबीज दोन सण; एकच नाते पण वेगळे अर्थ आणि परंपरा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भाऊबीज आणि रक्षाबंधन हे दोन्ही सण बहीण-भावाच्या प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे प्रतीक आहेत. दोन्ही सणांमध्ये बहीण भावाला ओवाळते. त्याच्या कल्याणासाठी प्रार्थना करते. भावाने तिच्या रक्षणाचे वचन दिले जाते. मात्र या दोन्ही सणांचा काळ, पौराणिक संदर्भ आणि सांस्कृतिक महत्त्व अगदीच वेगळे आहे.

### कधी साजरे केले जातात?

हिंदू पंचांगानुसार रक्षाबंधन हा सण श्रावणातील पौर्णिमेला येतो. भाऊबीज कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षातील द्वितीयेला म्हणजे दिवाळीनंतरच्या दुसऱ्या दिवशी असते. दोन्ही सण बहीण-भावाच्या नात्याला बळ देतात. त्यांचा मूळ आत्मा वेगळ्या कथांमध्ये दडलेला आहे.

### भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी, भगवान श्रीकृष्ण आणि द्रौपदी यांचे बंधन

रक्षाबंधन विशेषतः दोन पौराणिक प्रसंगांशी संबंधित मानला जातो. पहिल्या कथेनुसार राजा बळी याने आपल्या दानशूरतेने देवांनाही दबावाखाली आणले. देवतांच्या मदतीला भगवान विष्णू वामन अवतार घेऊन आले. बळीने दिलेल्या दानातून विष्णूंनी पृथ्वी, आकाश व्यापले आणि शेवटी त्याला पाताळलोकात पाठवले. विष्णू त्यांचे राज्य रक्षण करण्यासाठी तेथेच राहिले. त्यावेळी माता लक्ष्मी यांनी स्त्रीरूप धारण करून बळीच्या मनगटावर राखी बांधली. त्या बदल्यात भगवान विष्णूंना परत वैकुंठात पाठविण्याची विनंती केली. त्यामुळे राखी ही केवळ प्रेमाची नव्हे, तर बांधिलकीची निशाणी ठरली.

दुसऱ्या महाभारतकालीन कथेनुसार द्रौपदीने भगवान श्रीकृष्ण यांच्या हाताला जखम झाल्यावर आपली साडी फाडून बांधली. त्यानंतर भगवान श्रीकृष्ण यांनी तिच्या वस्त्रहरणाच्या प्रसंगात रक्षण केले. त्या दिवसाच्या स्मृतिप्रित्यर्थ बहिणी भावांना राखी बांधतात.

### यमराज आणि यमुनेचे शाश्वत नाते

भाऊबीजच्या मागे असलेली कथा यमराज आणि त्यांची जुळी बहीण यमुना (यमी) हिच्यावर आधारित आहे. कथेनुसार मृत्यूदेव यमराज नेहमी कर्मांची गणना करण्यात व्यस्त असत. त्यामुळे त्यांना यमीला भेटण्यास वेळ मिळत नसे. एकदा त्यांनी कार्तिक महिन्याच्या शुक्ल द्वितीयेला बहिणीला भेट दिली. यमीने त्यांचे औत्सुक्याने स्वागत केले. कपाळावर टिळा लावला आणि स्वादिष्ट भोजन दिले. त्या दिवसापासून बहिणी भावाला ओवाळून टिळा लावू लागल्या. भावाच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करू लागल्या. या सणाला 'यमद्वितीया' असेही म्हटले जाते. कारण असा विश्वास आहे, की त्या दिवशी टिळा लावलेल्या भावाला अकाली मृत्यूचा धोका नसतो. रक्षाबंधनात संरक्षणाचे वचन घेतले जाते, तर भाऊबीजमध्ये बहीण स्वतः भावासाठी आयुष्य आणि आरोग्याची प्रार्थना करते.

### सांस्कृतिक महत्त्व आणि परंपरेचा बदल

भारतीय ज्योतिषांच्या मते रक्षाबंधन हा आता धार्मिकतेबरोबरच सांस्कृतिक एकतेचे प्रतीक बनला आहे. प्राचीन काळात राजपूत राणी कर्णावतीने हुमायूनला राखी पाठवून संरक्षण मागितल्याची कथा प्रसिद्ध आहे. ब्रिटिश काळात देखील बंगाल विभाजनाच्या विरोधात एकतेचे प्रतीक म्हणून लोकांनी राखी बांधल्या. चित्रपट, साहित्य आणि लोकपरंपरेतून राखीने एक भावनिक बंध निर्माण केला आहे.

भाऊबीज मात्र घरगुती आणि कौटुंबिक सण म्हणून अधिक प्रिय आहे. लग्न झाल्यानंतर प्रत्येक वर्षी बहिणी माहेरी भावाला ओवाळण्यासाठी येतात. त्यातून नात्याचे गोड बंध पुन्हा जीवंत होतात.

### दोरा आणि टिळ्याचे महत्त्व

हिंदू परंपरेत प्रत्येक वस्तूला धार्मिक अर्थ असतो. राखीचा दोरा हा नात्याचे, जबाबदारीचे आणि कर्तव्याचे प्रतीक आहे. संन्यास घेताना हे बंध तोडले जातात. जे संसारातील सोडून देण्याचे चिन्ह आहे. टिळा मात्र आशीर्वाद आणि शुभतेचे प्रतीक आहे. युद्धाला जाण्यापूर्वी पत्नी पतीच्या कपाळावर कुंकवाचा टिळा लावत असे. आजही शुभ कार्य, प्रवास किंवा उत्सवाच्या निमित्ताने टिळा लावण्याची प्रथा आहे.

रक्षाबंधन असो वा भाऊबीज दोन्ही सण आपल्याला सांगतात, की रक्ताचे नाते हे फक्त जन्माने तयार होत नाही. ते प्रेम, जबाबदारी आणि श्रद्धेच्या भावनांनी अधिक मजबूत होते. राखीच्या दोऱ्यात जपलेले रक्षणाचे वचन आणि भाऊबीजच्या टिळ्यातील दीर्घायुष्याची प्रार्थना या दोन्ही परंपरा खरेतर भारतीय संस्कृतीतील बंधुत्व आणि स्नेहाचा उत्सव आहेत.

# गणेश चतुर्थीला चंद्रदर्शन का करत नाही?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



एकदा श्री गणपती उंदरावर बसून घाईघाईने जात असताना घसरले. तेव्हा त्यांना चंद्र उपहासाने हसला. ते पाहून श्री गणपती यांना चंद्राचा खूप राग आला. श्री गणपती यांनी चंद्राला शाप दिला, की आजपासून तुझे कोणी तोंड पाहणार नाही. जो कोणी पाहील त्यावर खोटा आळ येईल. शेवटी चंद्राने मोठे तप करून श्री गणपती यांना प्रसन्न करून घेतले. चंद्राच्या तपामुळे व सर्व देवांनी प्रार्थना केल्यामुळे श्री गणपती यांनी चंद्राला शापातून मुक्त केले. पण वर्षातून एक दिवस भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी म्हणजेच गणेश चतुर्थीच्या दिवशी तुझे तोंड कोणी पाहणार नाही. जो कोणी पाहील त्यावर त्या वर्षी खोटा आळ येईल, असे सांगितले. त्यावर चंद्राने प्रार्थना केली, की जर कोणी चुकून गणेश चतुर्थीच्या दिवशी माझे तोंड पाहील, तर खोटा आळ येऊ नये म्हणून त्याने काय करावे? तेव्हा श्री गणपती यांनी सांगितले, की त्याने संकष्ट चतुर्थी व्रत करावे. म्हणजे खोट्या आळातून त्याची मुक्तता होईल. गणेश चतुर्थीच्या दिवशी चंद्र पाहिल्यामुळे श्रीकृष्ण यांच्यावर स्यमंतक मणी चोरल्याचा खोटा आळ आला होता. तो आळ श्रीकृष्ण यांनी संकष्ट चतुर्थी व्रत केल्यामुळे गेला, अशी कथा आहे. आबालवृद्ध स्त्री-पुरुषांनी सर्वांनी करावयाचे हे एक साधे, सोपे मात्र शीघ्र फलदायी व्रत आहे. श्रावणातील संकष्ट चतुर्थी व मंगळवारी येणारी अंगारकी संकष्ट चतुर्थी विशेष फलदायी व महत्त्वाची मानतात. प्रत्येकाने निदान वर्षातून या दोन तरी अवश्य कराव्यात.

'श्री गणेश चतुर्थी' ला 'कलंकित चतुर्थी' असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पाहणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास 'श्रीमद्भागवता'च्या १० व्या स्कंधाच्या ५६-५७ व्या अध्यायात दिलेली 'स्यमंतक मण्याची चोरी' ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे. भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पाहावा. यामुळे चतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका राहत नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जलप्राशन करावे. या मंत्राचा २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करावा, अशी मान्यता आहे.

**सिंह : प्रसेनमवधीत् सिंहो जाम्बवता हतः ।**
**सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः ॥**
**(ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय ७८)**

**अर्थ :** हे सुंदर सुकुमार. या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे. जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे. त्यामुळे तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच

# वास्तुशास्त्रानुसार वास्तूत कोठे काय असावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय वास्तुशास्त्रानुसार घरातील प्रत्येक खोली आणि घटकांचे स्थान ठरविणे महत्त्वाचे आहे. कारण दिशांचा मानवी जीवनावर परिणाम होतो, अशी मान्यता आहे. खाली विविध घटकांचे योग्य स्थान आणि त्यांचे परिणाम दिले आहेत.

**शौचकूप (सेप्टिक टँक) – स्थान आणि परिणाम**

– **ईशान्य :** वाईट – सर्वनाश, आर्थिक आणि शारीरिक नुकसान, अपयश.
– **पूर्व :** वाईट – शारीरिक त्रास, आजार.
– **आग्नेय :** वाईट – कौटुंबिक कलह, दारिद्र्य, विशेषतः स्त्रियांना त्रास.
– **दक्षिण :** वाईट – नातेसंबंध बिघडण्याची शक्यता.
– **नैर्ऋत्य :** मध्यम – सामान्य अनुभव.
– **पश्चिम :** उत्तम – आरोग्य, समृद्धी आणि प्रगती.
– **वायव्य :** वाईट – अशांतता, चोरीचा धोका.
– **उत्तर :** वाईट – आर्थिक नुकसानाची शक्यता.
– **प्रवेशद्वाराजवळ :** वाईट – आर्थिक तणाव.

**भोजनगृह : योग्य स्थान :** पश्चिम दिशा सर्वोत्तम.

**स्नानगृह**

१) **योग्य स्थान :** आग्नेय कोपऱ्यालगत पूर्व बाजूस स्नानगृह असणे फायदेशीर.
२) **वॉश बेसिन/शॉवर :** ईशान्य किंवा पूर्व दिशेला.
३) **विद्युत उपकरणे :** आग्नेय कोपऱ्यात.
४) **बाथटब :** पूर्व-पश्चिम किंवा उत्तर-दक्षिण दिशेला; पाय दक्षिणेकडे येऊ नयेत.
५) **पाण्याचा निचरा (आऊटलेट) :** आग्नेय आणि नैर्ऋत्य कोपरे वगळता इतरत्र.
६) **आरसे :** पूर्व किंवा उत्तर दिशेला.
७) **स्नानाची दिशा :** पूर्व किंवा उत्तरेकडे तोंड करावे
८) धुण्याचे कपडे : वायव्य कोपऱ्यात ठेवावेत.

**शौचालय**

१) **अयोग्य स्थान :** ईशान्य, आग्नेय, नैऋत्य कोपरे आणि वास्तुचे मध्यभाग टाळावे.
२) **योग्य स्थान :** पश्चिम, उत्तर किंवा वायव्य दिशा.
३) **सेप्टिक टँक :** दक्षिण दिशेला नसावे.
४) **बसण्याची दिशा :** तोंड उत्तर किंवा पूर्वेकडे असावे.
५) **दारे :** पूर्व किंवा उत्तर दिशेला.
६) **पाण्याचा साठा/नळ :** ईशान्य कोपऱ्यात किंवा पूर्व/उत्तर दिशेला; आग्नेय आणि नैऋत्य टाळावे.
७) **साहित्य :** शौचालयात मार्बल टाळावे

**सेप्टिक टँक**

१) **अयोग्य स्थान :** आग्नेय, ईशान्य आणि नैर्ऋत्य कोपरे.
२) **योग्य स्थान :** उत्तर दिशेचे ९ समान भाग करून वायव्यकडून तिसऱ्या भागात.
३) **आऊटलेट :** उत्तर किंवा पश्चिम दिशेला.

टीप : सेप्टिक टँक वास्तुच्या मध्यभागी किंवा प्रवेशद्वाराजवळ नसावे.

**बैठक खोली (लिव्हिंग रूम) – स्थान आणि परिणाम**

ईशान्य : चांगले – सकारात्मक चर्चा.
पूर्व : उत्तम – श्रद्धा आणि विश्वासाला प्रोत्साहन.
आग्नेय : वाईट – चर्चा अपयशी.
दक्षिण : वाईट – वादविवाद किंवा पाट्यांची शक्यता.
नैर्ऋत्य : वाईट – नकारात्मक विचारांचा प्रभाव.
पश्चिम : मध्यम – उत्साहाचा अभाव.
वायव्य : मध्यम – चर्चेत नाराजी.
उत्तर : उत्तम – सर्व प्रश्नांची उत्तरे मिळण्याची शक्यता.


